Daily Sakal

Dt.: 28th March 2024

सकाळ




**बीएमसीसी रस्ता** : पुणे लोकसभा निवडणुकीसाठी शहरांमध्ये मतदानाचा टक्का वाढावा. यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी फलक दाखवत व घोषणा देत मतदार जनजागृती केली.

Pune, Pune-Today
28/03/2024 Page No. 7

लोकमंथन

# शिरुर लोकसभा मतदारसंघातील आदिवासी बहुल भागात मतदार जागृती



पुणे / प्रतिनिधी

शिरुर लोकसभा मतदारसंघातील मंचर येथील अण्णासाहेब आवटे कॉलेजकडून आदिवासी बहुल भागात स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

निवडणूक प्रक्रियेमध्ये नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग मिळावा यासाठी समाजातील विविध घटकांच्या सहभागाने प्रशासनाकडे विविध जनजागृतीचे उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. मतदान प्रक्रियेत मतदानाचे प्रमाण व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग वाढावा यासाठी स्वीप अंतर्गत व्यापक जनजागृतीवर भर देण्यात आला असून मतदार जनजागृतीसाठी ग्रामीण भागामध्ये उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. याचाच एक भाग म्हणून शिरुर मतदारसंघात व्यापक प्रमाणात जनजागृतीवर भर देण्यात आला आहे. 'युवकांचे मतदान-राष्ट्र निर्माणातील योगदान' 'जागृत नागरीक होऊ या- अभिमानाने मत देवू या', या व अशाप्रकारच्या विविध घोषणा फलकांच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेविषयी आणि निवडणूक प्रक्रियेसंदर्भात आदिवासी भागात पथकाने मार्गदर्शन केले. मतदानाचा दिनांक, मतदानाचा कालावधी तसेच मतदान केंद्रातील सुविधा याबाबत नव मतदार, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना माहिती देण्यात आली. यावेळी आंबेगाव तहसील कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

आंबेगाव येथे मतदारांकडून मतदान करण्याबाबत संकल्पपत्र भरून घेण्यात आले. तसेच त्यांना मतदान केंद्राची माहिती कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. जुन्नर तालुक्यातील राजुरी येथील विद्या विकास मंदिर विद्यालयातर्फे मतदार जागृती फेरी आणि व्याख्यानांच्या माध्यमातून मतदार जागृती करण्यात आली.

नवभारत

# स्वीप नोडल अधिकारियों की राज्य स्तरीय कार्यशाला का उद्घाटन

■ पुणे, (सं). भारत निर्वाचन आयोग एवं मुख्य निर्वाचन अधिकारी महाराष्ट्र राज्य की ओर से यशदा में लोकसभा चुनाव के संबंध में मतदान जागरूकता पर स्वीप नोडल अधिकारियों की दो दिवसीय राज्य स्तरीय कार्यशाला का आयोजन किया गया. इस समय राज्य के मुख्य निर्वाचन अधिकारी एस. चोकलिंगम, भारत निर्वाचन आयोग के स्वीप निदेशक संतोष अजमेरा, कलेक्टर डॉ. सुहास दिवसे, आयोग की वरिष्ठ स्वीप सलाहकार अनुराधा शर्मा समेत अन्य अधिकारी उपस्थित थे. कार्यशाला में कम मतदान प्रतिशत वाले निर्वाचन क्षेत्रों में मतदान बढ़ाने, शहरी नागरिकों की चुनावी भागीदारी बढ़ाने के लिए स्वीप के तहत चुनाव आयोग द्वारा की गई गतिविधियों की जानकारी देने के साथ ही विभिन्न जिलों में क्रियान्वित की जा रही नवीन गतिविधियों पर चर्चा की जाएगी.



Pune-plus Edition
28-march-2024 Page No. 4
epaper.enavabharat.com

पुण्य नगरी

# स्थलांतरीत कामगारांच्या मतदानासाठी कृतियोजना

**बारामती लोकसभा मतदारसंघात सूक्ष्म नियोजन**

**पुणे : प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदारसंघात मतदानाचे प्रमाण वाढावे याद्दष्टीने कमी मतदान असलेल्या मतदान केंद्राबाबत सूक्ष्म नियोजन करण्यात येणार आहे. तत्पूर्वी स्थलांतरीत कामगारांचे मतदान सुलभ होईल यासाठी कृतीयोजना तयार करण्याच्या सूचना बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी यांनी दिल्या. विभागीय आयुक्त कार्यालयात आढावा बैठक झाली. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी हनुमंत अरगुंडे, उपायुक्त समिक्षा चंद्राकार, बारामती लोकसभा मतदारसंघातील सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आणि लोकसभा निवडणुकीसाठी नियुक्त जिल्हास्तरीय समन्वयक अधिकारी उपस्थित होते. द्विवेदी म्हणाल्या, 'मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी स्वीप कार्यक्रमावर अधिक भर द्यावा. स्थलांतरीत कामगारांना त्यांच्या मतदानाबाबत माहिती द्यावी, यासाठी उद्योजक आणि व्यावसायिकांची मदत घ्यावी. वयोवृद्ध आणि दिव्यांग मतदारांना सुलभपणे मतदान करता येईल, अशी व्यवस्था करण्यात यावी. मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेताना निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करावे.' बारामती लोकसभा मतदारसंघांतर्गत सर्व ६ विधानसभा मतदारसंघातील वैशिष्ट्यपूर्ण मतदान केंद्र निश्चित करून त्याची माहिती सादर करावी. यावेळी मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, ईव्हीएम व्यवस्थापन, स्वीप कार्यक्रम, माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण, टपाली मतदान, सुरक्षा व्यवस्था आदी विविध विषयांचा आढावा घेऊन सुक्ष्म नियोजन करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.

लोकमत

# ७१ हजार मतदार करतील पहिल्यांदाच मतदान

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर जिल्ह्यात ८१ लाख २७ हजार १९ मतदार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मतदारसंघनिहाय उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेच्या १० दिवस आधीपर्यंत मतदार नोंदणी करता येणार असल्याचे केंद्रीय निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे ही संख्या वाढणार आहे. जिल्ह्यात नवमतदारांची संख्या ७१ हजार ५८८ असून हे मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत.

## वयोगटनिहाय मतदार किती?

| वयोगट | मतदार |
|---|---|
| १८ ते १९ | ७१५८८ |
| २० ते २९ | १३०५९७४ |
| ३० ते ३९ | २०१४६९३ |
| ४० ते ४९ | १८६२८४६ |
| ५० ते ५९ | १२९४०४६ |
| ६० ते ६९ | ८३९८९३ |
| ७० ते ७९ | ४८९१८७ |
| ८० ते ८९ | १९४९११ |

## मतदार नोंदणी सुरुच

जिल्ह्यात नवमतदार अर्थात १८ ते १९ या वयोगटात ७१ हजार ५८८ जण आहेत. हे मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. मतदारसंघनिहाय उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेच्या १० दिवस आधीपर्यंत मतदार नोंदणी करता येणार असल्याचे केंद्रीय निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

## ८० पेक्षा जास्त वयाचे :

जिल्ह्यात ६० ते ६९ या वयोगटात ८ लाख ३९ हजार ८९३, तर ७० ते ७९ या ४ लाख ८९ हजार १८७ तर ८० ते ८९ या वयोगटात १ लाख ९४ हजार ९११ मतदार आहेत. ८० पेक्षा जास्त वयाचे उमेदवार कमी आहेत. ६० वर्षावरील मतदारांची संख्या १५ लाख ७७ हजार ८७२ इतकी आहे.

लोकमत

# बारामती मतदारसंघात मतदान जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती लोकसभा मतदारसंघात स्वीप उपक्रमांतर्गत लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी अधिकाधिक मतदारांनी निवडणूक प्रक्रियेत सहभागी होऊन मतदान करावे, याकरिता मतदान व मतदार जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले. मानवी साखळी, रांगोळी स्पर्धा, मतदान प्रतिज्ञा, प्रभातफेरी, भजन आदी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

बारामती विधानसभा मतदारसंघात राधेश्याम एन अग्रवाल टेक्निकल इन्स्टिट्युट अँड कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने मतदान जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदारांना मतदान जनजागृतीचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून मतदानाचा संदेश दिला, तसेच रांगोळी, घोषवाक्याच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात आली.

इंदापूर विधानसभा मतदारसंघात भवानीनगर येथील गोविंदराव पवार विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालच्या वतीने प्रभातफेरीचे आयोजन करून मतदारांची जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी घोषवाक्याद्वारे नागरिकांना मतदान करण्याबाबत संदेश दिला. सरडेवाडी येथे वोटर हेल्पलाइन ॲपबाबत मतदारांना माहिती देण्यात आली.

भोर विधानसभा मतदारसंघात वेल्हे पंचायत समिती येथे तालुकास्तरीय मतदार जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले. यावेळी अंगणवाडीसेविका, मदतनीस सहभागी झाल्या होत्या. त्यांना मतदान जनजागृती मार्गदर्शन करण्यात आले. दौंडमध्ये महिला मतदान जनजागृती मोहिमेंतर्गत केडगाव बाजारपेठ येथे जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले. यावेळी परिसरातील दुकानदार कर्मचारी, भाजी विक्रेते आदींना मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले,

Hello Pimpri Chinchwad
Page No. 8 Mar 28, 2024
Powered by: erelego.com

सकाळ

# दौंड तालुक्यात मतदानाबाबत जनजागृती

Pune, District-Today
28/03/2024 Page No. 3

सकाळ



पिंपळगाव (ता. दौंड) : मतदानाबाबत जनजागृती करताना अंगणवाडी व आशा सेविका.

खुटबाव, ता. २७ : दौंड तालुक्यातील १४ मंडल कार्यालयांमध्ये निवडणूक आयोगाच्या वतीने मतदानविषयक जनजागृती करण्यात आली. तालुक्यातील पिंपळगाव, यवत, वरवंड, दौंड, पाटस, केडगाव, राहू, देऊळगाव राजे, मलठण, गिरिम, खामगाव या ठिकाणी मतदान जागृतीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तसेच अंगणवाडी व आशा सेविका यांच्या वतीने महिलांची प्रभात फेरी काढण्यात आली.

गावातील ग्रामस्थ, विक्रेत्यांना 'वोटर हेल्पलाइन ॲप'मधून स्वतःचे नाव मतदार यादीत कसे तपासावे, यासंदर्भात प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. एखाद्याचे नाव मतदार यादीत नसल्यास सहा नंबर फॉर्म भरून आपण त्वरित नाव नोंदवू शकता, याबाबत माहिती देण्यात आली. घोषणा व घोषवाक्यांच्या माध्यमातून मतदान करण्याविषयी जनजागृती करण्यात आली.

यासंदर्भात बारामती महसूल विभागाचे तुषार बोरकर म्हणाले, "लोकसभा निवडणुकीमध्ये अधिकाधिक मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी जागृत करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. आगामी काळामध्ये निवडणूक आयोगाच्यावतीने मतदान जनजागृतीसाठी अधिकाधिक उपक्रम राबवले जाणार आहेत."

Pune, District-Today
28/03/2024 Page No. 3